नियमित फौ. ख. क्र. ६६/२०२३
सरकार -वि.- राकेश व इतर
नि.क्र. १४.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सौरभ अरविंद रार्घोते
वय २६ वर्षे, व्यवसाय – दुकान,
राहणार – जवराबोडी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दि.०७.०८.२०२३ रोजी पोलिसांनी मला पोलीस स्टेशनला बोलाविले होते. तेथे माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हता. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.१५** देण्यात येते. त्यावेळी माझ्यासोबत रोहीत अनकर हजर होता.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०८.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स देऊन पोलीस स्टेशन भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तिथे माझ्या समक्ष आरोपी राकेश पौनीकर याच्या ताब्यातून एक लोखंडी रॉड व बांबूची काठी जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केला

मला वाचून दाखविला, माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १३.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.